...ग.दि.
...लेखन
...पुणे,
...९७.
...न्सी

13

# एक देश एक निवडणूक एक विश्लेषण

**डॉ. डोंगरे एल. बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि. नांदेड

**********

एक राष्ट्र एक निवडणूक हे भारतीय राजकारणातला एक चर्चेचा व चिंतनाचा विषय आहे. भारताच्या प्रजासत्ताकाच्या वाटचालीची सत्तर वर्ष पूर्ण झाली या सत्तर वर्षाच्या काळात घटनात्मक संस्था असलेल्या निवडणूक आयोगाने काही अपवाद वगळता शांत भयमुक्त वातावरणात निष्पक्षपणे निवडणूका घेतल्या आहेत. हे आपल्या लोकशाहीचे एक मोठे यश आहे. निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात निवडणूक आयोगाने निवडणूका घेवून सुध्दा निवडणूक प्रक्रियेबाबत शंका उपस्थित करुन लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणूका एकाचवेळी घेण्यात याव्या असा अनेकांनी प्रस्ताव मांडण्यात आल्याचे दिसून येते. भारताच्या राज्यघटनेमध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणूका एकत्र घेण्याबाबतचे कोणतेही घटनात्मक प्रावधान नाही. तरी पण तत्कालीन घटना पुनर्विलोकन आयोग, विधी आयोग, भारताचे पंतप्रधान, भारताचे राष्ट्रपती यांनी एक राष्ट्र एक निवडणूक या संकल्पनेचे समर्थन केल्याचे दिसून येते. एक राष्ट्र एक निवडणूक समर्थनाच्या भुमिकेमागचा उद्देश अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

एक राष्ट्र एक निवडणूक याचा फायदा काय तोटा काय याचाही विचार होणे या अनुषंगाने महत्त्वाचे आहे. १९६७ ला लोकसभा आणि विधानसभा यांच्या निवडणूका एकाचवेळी घेण्यात आल्या होत्या. परंतु बऱ्याच राज्यामध्ये पाच वर्ष पुर्ण होण्याआधीच विधानसभा बरखास्त कराव्या लागल्या. लोकसभेच्या मध्यावधी निवडणूका आणि विधानसभेच्या मध्यावधी निवडणूका यामुळे निवडणूका एकत्र घेण्याची पध्दत बंद झाली.

एक राष्ट्र एक निवडणूकीची कल्पना विधी आयोगासह काही व्यक्ती, संस्था, संघटनांनी समर्थन करुन त्यावर सकारात्मक विचार करावे असे स्पष्ट केले. या प्रस्तावाचा काही राजकीय पक्षांनी समर्थन तर काहींनी विरोध केला आहे. जनता दल (संयुक्त), समाजवादी पक्ष आणि तेलंगाणा राष्ट्र समिती, भाकप, माकप, तृणमुल

काँग्रेस, द्रमुक या पक्षांनी विरोध केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १९६७ प्रमाणे एकत्र निवडणूक घेण्यात याव्यात अशी भुमिका आहे. त्यांनी याबाबत सर्वपक्षीय बैठक बोलावली या बैठकीस ४५ पक्षापैकी २२ पक्ष उपस्थित होते.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक राष्ट्र एक निवडणूक ही व्यवस्था का हवी आहे याचेही विश्लेषण होणे महत्त्वाचे आहे. २०१४ ला नरेंद्र मोदी यांनी स्वतःची प्रतिमा आणि विकासाचा मुद्दा पुढे करुन निवडणूक जिंकून केंद्रात आणि बऱ्याच राज्यामध्ये भाजपाने सत्ता काबीज केली. परंतु दरवर्षी कुठल्यातरी राज्याच्या निवडणूका संपन्न होत असतात. पंतप्रधान मोदीसह सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांना निवडणूकीत प्रचारदौरे करावी लागतात. या प्रचारादरम्यान केंद्राने घेतलेल्या निर्णयाबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नाबाबत खुलासे द्यावे लागते. नोटबंदी, जिएसटी, महागाई, कर्जमाफी, रोजगार या सारख्या प्रश्नांवर सत्ताधारी पक्षांवर केलेल्या आरोपाचे खंडण करावे लागते. प्रत्येक राज्याच्या निवडणूकीत सत्ता मिळवण्यासाठी तिथल्या मुख्यमंत्री पदाच्या उमेदवारापेक्षा नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांना जनमत अनुकूल करण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागतात. भाजपाने २०१४ पासून संपन्न झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत नरेंद्र मोदी हा चेहरा वापरला आहे. म्हणुन एकदाच निवडणूका झाल्यातर नरेंद्र मोदीसह सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांचा वेळ वाचेल. याशिवाय नरेंद्र मोदी यांना राज्याचा निवडणूकीत पुन्हा पुन्हा केंद्र सरकारवरील आरोपाचे खंडण करण्याची आवश्यकता उरणार नाही. म्हणुन भाजपा आणि मोदी यांना एक राष्ट्र एक निवडणूक आवश्यक वाटते. एक राष्ट्र एक निवडणूक ही संकल्पना मोदी आणि भाजपा यांच्या हिताची असली तरी देश आणि सामान्य नागरीक यांच्या हिताची नाही कारण वारंवार होणाऱ्या निवडणूकामुळे केंद्र आणि राज्यात चांगले लोककल्याणकारी निर्णय घेण्यास मदत झाल्याचे दिसून येते. हे तेलंगाणा, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र या राज्यात दिसून येते. लोकसभा आणि विधानसभाच्या निवडणूका एकत्र झाल्यावर राज्याचे विषय बाजूला जातात व राष्ट्रहिताचे विषय चर्चेला येतात. एक राष्ट्र एक निवडणूक यावर तेलगांणा माकप नेते सिताराम येचूरी म्हणतात "या विषयावर चर्चा करणे व्यर्थ आहे. संसदिय कामकाजाची कार्यक्षमता कशाने वाढते याबाबत सुचना सरकारला दिल्या आहेत. एक देश एक निवडणूक हा प्रस्तावच लोकशाहीच्या विरोधी आहे. याने लोकशाहीचा पायाच खचेल" असे मत व्यक्त केले. लोकसभा आणि विधानसभा निवडणूका एकत्र झाल्या तर शेतकऱ्याचे प्रश्न, बेरोजगारी, दुष्काळ, शहरी ग्रामीण समस्या, ढासाळलेली अर्थव्यवस्था या समस्या दुर्लक्षीत होतील. प्रादेशिक पक्षाच्या राजकारणाला मर्यादा येवून राष्ट्रीय पक्षाचे महत्त्व वाढते. म्हणुन या प्रस्तावाला प्रादेशिक पक्षांचा विरोध आहे.

भारत हा देश अनेक राज्यांनी मिळून बनलेला राज्यांचा संघ आहे. प्रत्येक राज्याचे स्वतःचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय अस्मिता आहे. केंद्राचा एखादा निर्णय राज्याच्या अस्तित्वाला आणि अस्मितेला आव्हान देणारा असेल तर त्या विरोधात असंतोष व्यक्त करण्यासाठी राज्याला पाच वर्ष निवडणूकीची वाट पाहावी लागेल. म्हणुन एक राष्ट्र एक निवडणूक संकल्पना संसदीय लोकशाही असलेल्या देशात तांत्रिकदृष्टया अवघड आहे. अध्यक्षीय लोकशाही असलेल्या देशांत ते शक्य आहे. परंतु भरतात अध्यक्षीय व्यवस्था निर्माण करण अशक्य आहे. म्हणुन ही संकल्पना व्यवहारात येण्याची शक्यता धुसर आहे.

एक देश एक निवडणूकीच्या गुणांचा विचार करता निवडणूकीत खर्च होणाऱ्या पैशांचा अपव्यय टाळता येवू शकते. हा पैसा लोककल्याणकारी कामांसाठी वापरता येवू शकतो. विकास कामाला चालना मिळून प्रशासनाची कार्यक्षमता वाढते. काळया पैशांवर प्रतिबंध घालता येते. या काही गुणाबरोबरच उणिवांचाही विचार झाला पाहिजे. यामुळे राष्ट्रीय विषयाबरोबर प्रांतीक विषय बाजुला जातात. याबरोबरच सर्व निवडणूका एकदाच घेतल्या तर निवडणूक घेण्यासाठी लागणारी यंत्रणा आहे काय ? निवडणूका झाल्यानंतर निवडणूक निकाल लावण्यास विलंब होईल.

एक देश एक निवडणूकीतला सर्वात मोठा अडथळा म्हणजे घटनादुरुस्तीची किचकट प्रक्रिया आहे. यासाठी भारताच्या राज्यघटनेत आमुलाग्र असा बदल करावा लागतो. केंद्र सरकार घटना दुरुस्ती करेलही परंतु केशवानंद भारती खटल्यानुसार घटनेच्या मुलभूत भागात बदल करण्याचा अधिकार संसदेला नाही. यामुळे यासाठी घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. एक राष्ट्र एक निवडणूक या प्रस्तावाबाबत पक्षविरहीत, राष्ट्रहित या पातळीवरुन विचार करुन हा निर्णय घेतल्यास शासन आणि जनतेच्यादृष्टीने हितावहच राहील.

❑❑❑

Head of the Dept.
Phy. Edu. & Sports
Hutatama Jayvantrao Patil
Mahavidyalaya, Himayatnagar.